# "Azadi Ka Amrit Mahotsav" Celebration with various camps

क्वालिटी माचिस
Kwality MATCHES
A PRODUCT OF GHODAWAT GROUP
Ltd. by : Kwality Products, Jaysingpur.
150/1 Sangli-Kolhapur Road, Manali Garden, Jaysingpur 416101

जागृत लोकनेता
jagrutloknetajsp@gmail.com

Chakote
Range Happiness Ki...
Soan Papdi
श्री गणेश बेकरी नांदणी

RNI No.-MAHMAR/2004/16973 | गुरूवार ९ सप्टेंबर २०२१ | पाने ६ | किंमत-२ रुपये | Postal Reg.No.-KLR-245/2016-2018





## कै.सौ.हौसाबाई होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजमध्ये विविध कार्यक्रमांनी सप्ताह साजरा

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**

निमशिरगाव (ता. शिरोळ) येथे भारत सरकार आयुष मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने कै. हौसाबाई होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे विविध कार्यक्रमांनी सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहामध्ये मोफत आरोग्य तपासणी, होमिओपॅथीक औषधांचे वाटप, रक्तगट, रक्ताचे प्रमाण तपासणी, संतुलीत आहार, मधुमेही रुग्णांना आहाराचे नियोजन व औषध वनस्पतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेतील मुलांना औषधी वनस्पतींचा उपयोग तसेच जंकफुडचे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिरटी व निमशिरगाव येथे औषधी वनस्पतीचे रोपण करण्यात आले. या सप्ताहामध्ये आयुष मंत्रालय यांनी वेगवेगळे ऑनलाईन उपक्रम राबविले होते. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. सर्व कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे चेअरमन डॉ. सुकुमार मगदूम, प्राचार्या डॉ. शुभांगी मगदूम सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व अन्य कर्मचारी यांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम संपन्न झाले.